# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.

## प्रसिध्दीपत्रक

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील **(१)** संरक्षण अधिकारी, गट- ब (अराजपत्रित)- २ पदे **(२)** परिविक्षा अधिकारी,गट-क ७२ पदे **(३ )** लघुलेखक (उच्चश्रेणी), गट-क १ पद **(४)** लघुलेखक (निम्नश्रेणी), गट-क २ पदे **(५)** वरिष्ठ लिपीक/सांख्यिकी सहायक, गट-क ५६ पदे **(६)** संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क ५७ पदे **(७)** वरिष्ठ काळजी वाहक, गट-ड ४ पदे **(८)** कनिष्ठ काळजी वाहक, गट-ड ३६ पदे **(९)** स्वयंपाकी, गट-ड ६ पदे भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील निम्न नमुद सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन दि.१४-१०-२०२४ ते दि.१०-११-२०२४ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर भरती प्रक्रियेच्या संगणक आधारीत **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा राज्यातील ४५ परीक्षा केंद्रावर दि.१०-२-२०२५ ते दि.१३-२-२०२५ व दि.१७-२-२०२५ रोजी** विविध सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

**१.** सदर संगणक आधारीत वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेच्या उत्तरतालिका व प्रश्नतालिका पाहण्याची तसेच प्रश्नतालिका /उत्तरतालिका याबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याबाबतची ऑनलाईन सुविधा शुक्रवार **दि.२८-२-२०२५ते दि.८-३-२०२५** पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

**२.** त्यानुसार, उमेदवारांनी सादर केलेले आक्षेप विचारात घेवून, उक्त नमुद ऑनलाईन परिक्षेची **सुधारीत उत्तरतालिका** दि.२६-४-२०२५ पासून प्रसिध्द करण्यात आलेली होती.

**३.** सदर सुधारीत प्रश्नतालिका/ उत्तरतालिकेवर आक्षेप प्राप्त झालेले असल्याने, सदर आक्षेपाचे निराकरण करुन अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर अंतिम उत्तरतालिका पाहण्यासाठी उमेदवारांनी https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर त्यांचे विहीत आयडी व पासवर्डव्दारे लॉग इन करावे. **उक्त नमुद भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने, उमेदवारांना प्रश्नतालिका/उत्तरतालिका याबाबत आक्षेप सादर नोंदविण्यासाठी पर्याप्त कालावधी देण्यात आलेला होता. त्यामुळे या प्रसिध्दीपत्रकाच्या दिनांकापासुन प्रश्नतालिका/उत्तरतालिका बाबत कोणत्याही स्वरुपाचे आक्षेप स्विकारण्यात येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

४. **उक्त नमुद भरती प्रक्रियेचा निकाल प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून, भरती प्रक्रियेशी** संबधीत अदयावत सूचना/प्रसिध्दीपत्रक याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या https://www.wcdcommpune.com संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देण्याबाबत सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येत आहे.

**५.** https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर लॉगिन करताना तांत्रिक अडचणी आल्यास संबधित उमेदवारांनी **७३५३००९०९४** या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. सदर टोल फ्री क्रमांक सोमवार ते शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत सुरु राहील.

दिनांक :- २७/५/२०२५
स्थळ :- पुणे

**(राहुल मोरे)**
**आयुक्त**
**महिला बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**